महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ९९ वे | दिनांक : ०२/०४/२०२६ | वार : गुरूवार

## विलीनीकरणाचा विषय आमच्याकडून संपलाय : आम्ही स्वतंत्र लढणार; शरद पवार गटाची स्पष्ट भूमिका





**पुणे :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे विलीनीकरण होणार अशा चर्चा वारंवार केल्या जात आहेत. तसेच अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी 16 फेब्रुवारी रोजी एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना म्हटले होते की विलीनीकरणाबद्दल माहीत नव्हते. आता 31 मार्च रोजी एका चॅनलला मुलाखत देताना म्हटले की, विलीनीकरणाच्या चर्चेबद्दल माहीत होते. तसे झाले तर स्वागतच आहे, असे विधान केले. यावरून शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी टीका केली आहे. तसेच शरद पवार गटाची अधिकृत भूमिका मांडली आहे.

विकास लवांडे म्हणाले, मी पक्षाचा अधिकृत प्रदेश प्रवक्ता या नात्याने स्पष्ट करू इच्छितो की आमच्या सर्व प्रमुख नेत्यांनी यापूर्वी विलीनीकरणाच्या संदर्भात ज्यावेळी अजितदादांचे दुर्दैवी निधन झाले त्यानंतर हा विषय आमच्या पातळीवरून पूर्णपणे संपलेला आहे. भविष्यात आमचा पक्ष स्वतंत्रपणे मजबूतपणे संघटन बांधणी करून पुढच्या निवडणुकांना स्वतंत्रपणे सामोरे जाणार आहे. त्यामुळे मी आमच्या पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना सांगू इच्छितो की कुठल्याही अफवांवर किंवा कुठल्याही बातमीवर विश्वास ठेवू नका. तसेच यावर आपल्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे तसेच खासदार सुप्रिया सुळे यांनी याचे सुतोवाच वारंवार केले आहे. त्यामुळे विलीनीकरणच्या बातम्या कोणीही जर स्वार्थी राजकारणाच्या हेतूने पेरत असेल तर ते चुकीचे आहे.

पुढे बोलताना विकास लवांडे यांनी सुनील तटकरे यांच्यावर टीका केली आहे. सुनील तटकरे यांनी पूर्वी सांगितले होते की विलीनीकरणबाबत मला माहीत नव्हते, आता त्यांचे वक्तव्य समोर आले आहे की याबाबत मला माहीत होते. यावर लवांडे म्हणाले, सुनील तटकरे हे खोटे बोलतात हे पुन्हा पुन्हा सिद्ध होत आहे. 16 फेब्रुवारी रोजी एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना म्हटले होते की, मला विलीनीकरणाची चर्चा माहिती नव्हती. आता 31 मार्च रोजी एका चॅनलला मुलाखत देताना म्हटले की, हो मला ते माहीत होते. विलीनीकरण होणार असेल तर स्वागत करू. अशी दुटप्पी धोरण त्यांनी स्वीकारले आहे. 'कपटी मित्रा पेक्षा दिलदार शत्रू बरा', अशी आमच्या गावाकडे म्हण आहे, असे सांगत त्यांनी टोला लगावला आहे.

पुढे बोलताना विकास लवांडे म्हणाले, एका बाजूला म्हणायचे की मी अजितदादांचा मित्र आहे, तर दुसरीकडे अजितदादांच्या निधनानंतर अजित पवारांनी घेतलेले सर्व निर्णय स्थगित करण्याचे काम केले. अजितदादांनी विलीनीकरणाचे प्रयत्न सुरू केले होते, ते स्थगित केले. त्यामुळे मला एकच त्यांना सांगायचे आहे की, यापुढे जर अजितदादांना अशा प्रकारे खोटं ठरवत असाल तर दादांचा मी मित्र होतो असे कधीही म्हणू नका.

अशोक खरात प्रकरणी प्रश्न विचारण्यात आला असता विकास लवांडे म्हणाले, अजितदादांच्या पक्षाचे प्रमुख नेते सुनील तटकरे आणि रुपाली चाकणकर या वारंवार सिन्नरला जात होते. ते तिथे कही पक्षाच्या कामाला जात नव्हते. काही दिवसांपूर्वी सुनील तटकरे अचानक दिल्लीवरून मुंबईत मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी आले होते. ते रुपाली चाकणकर यांना आणि स्वतःला त्या एसआयटीमधून वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. अटकेतून सुटका व्हावी यासाठी ते मुख्यमंत्र्यांना भेटत असावेत.

## छत्रपती संभाजीनगरला मे अखेर मिळणार ३४ वातानुकूलित ई शहर बस



**छत्रपती संभाजीनगर :** मध्ये पाणीपुरवठा योजनेसारखीच अवस्था नवीन ३४ इलेक्ट्रिक बस येण्याची झाली आहे. जून २०२३ पासून नवनवीन डेडलाईन दिली जात आहे. यात आता मे २०२६ ची भर पडली आहे. स्मार्ट सिटी प्रशासनाला माहिती अधिकारातून विचारलेल्या विविध प्रश्नांमधून अनेक बाबींचा उलगडा झाला.

शहराची वाढ, विस्तार पाहता सार्वजनिक वाहतूक फार तोकडी आहे. आंतरराष्ट्रीय नियमानुसार शहराला अपेक्षित १ हजार बसच्या तुलनेत फक्त १०० बस (डिझेल) उपलब्ध आहेत. त्यातील साधारण ८० बस नियमित वापरात असतात. त्यामुळे नवीन येणाऱ्या ३४ एसी इलेक्ट्रिक बस थोडासा दिलासा देऊ शकतात. यासाठी ‘हवी शुद्ध हवा’ अभियानाअंतर्गत ‘आम्ही पर्यावरण प्रेमी’( विविध संस्थांचा मंच) स्मार्ट सिटी प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहे. यातून वेगवेगळ्या वेळी, १५ मागण्या करण्यात आल्या. शिवाय काही माहिती मागण्यात आली. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याने रूपेश कलंत्री यांनी माहिती अधिकार अर्ज, त्यानंतर प्रथम अपील दाखल केला.

स्मार्ट सिटी बस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार निर्माता कंपनीला यापूर्वी तीन नोटीस बजावण्यात आल्याचे उघड झाले. प्रत्येक नोटीसमध्ये विषय गांभीर्याने घेण्याबद्दल लिहिले होते. मात्र कंपनीने भीक घातली नाही. ८ जानेवारी २०२६ रोजीच्या चौथ्या नोटीसमध्ये, समाधानकारक उत्तर आणि वेळेत बस न दिल्यास दंड, बँक गॅरंटी जप्त करणे, करार रद्द करणे आणि काळ्या यादीत टाकण्याचा इशारा देण्यात आला. अशाच प्रकारचा इशारा यापूर्वीच्या नोटिसांमध्ये देण्यात आला होता, हे विशेष. याशिवाय स्मरणपत्रे देखिल देण्यात आली आहेत. आता मे २०२६ अखेर, ३४ बस देण्याचे कंपनीने कळवले आहे. एक बस नमुनादखल आधीच मिळाली आहे.

## आम्हाला चांगले स्थान मिळाले नाही तर गिअर बदलणार : शिवसेनेच्या आमदाराचा मित्रपक्षाला इशारा



**रायगड :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आगामी लोकसभेसाठी आत्तापासूनच तयारी सुरू केली असल्याचे दिसून येत आहे. मंगळवारी शिवसेना शिंदे गटाने राज्यातील लोकसभा मतदारसंघाच्या संपर्कप्रमुखांची घोषणा केली. यावेळी मुंबईसह ठाण्याची जबाबदारी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. अशातच आता शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांनी थेट मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसलाच इशारा दिला आहे.

रायगड येथे माध्यमांशी संवाद साधताना महेंद्र दळवी म्हणाले, कोकणात सर्वात मोठा पक्ष आमचा आहे. त्यामुळे तो क्लेम आमचा आहे. येणाऱ्या लोकसभेची तयारी आमचे नेते करत आहेत. आम्ही सर्व सज्ज आहोत. जिल्हा परिषदेत जे समीकरण झाले, ते आम्ही स्वीकारले आहे. जागावाटपात आमचा दोन नंबर लागेल. आम्हाला चांगले स्थान मिळाले नाही तर गिअर बदलण्याची ताकद आमच्यामध्ये असल्याचे दळवी यांनी म्हटले आहे.
अशोक खरात प्रकरणी बोलताना महेंद्र दळवी म्हणाले, ज्यांनी केले आहे त्यांना भोगावे लागणार आहे. खरातला पाठिंबा देणाऱ्या लोकांवरही कारवाई होणार आहे. अशोक खरातने महिलांवर अन्याय केला. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र हळहळला आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते व मंत्री सुनील तटकरे, मंत्री अदिती तटकरे व अनिकेत तटकरे यांच्यावर होत असलेल्या आरोपांवर मंत्री भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले यांनी भाष्य केले आहे. आकाश चौधरी यांच्या सोबत असलेल्या मंत्री अदिती तटकरे आणि अनिकेत तटकरे यांच्या भागीदारीतील कंपन्यांविरोधात जिलहा परिषद सदस्य असलेले विकास गोगावले म्हणाले, जयंत पाटील यांनी दीडशे कंपन्या सांगितल्या होत्या. त्या कंपन्या डिमॉलिश कुठे झाल्या. मी बोललो तर हेडलाइन बनेल, त्यामुळे तपासात समोर येईल, असे त्यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०२ मार्च २०२६

## “आदर्श शिक्षक पुरस्काराने नितीन कपटी यांचा गौरव; शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल”




**पुणे :** ध्येय एज्युकेशन फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने दिला जाणारा “आदर्श शिक्षक पुरस्कार” यंदा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कापूसवाडी केंद्र ढोरकिन येथील नितीन कपटी यांना प्रख्यात जगातील एक नंबरची डिजिटल शाळा करणारे आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे सर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न आणि नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, विविध स्पर्धात्मक परीक्षेचे आयोजन, ऑनलाइन शिक्षण प्रणाली याबद्दल त्यांची निवड करण्यात आली.हा पुरस्कार सोहळा ग. दि. माडगूळकर सभागृह, निगडी पुणे येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी तसेच अनेक शिक्षक उपस्थित होते. पुरस्कार प्रदान करताना मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.पुरस्कारप्राप्त शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी घेतलेले उपक्रम, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी केलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय ठरले. या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला नवी प्रेरणा मिळाली असून त्यांनी भविष्यातही शिक्षण क्षेत्रात असेच कार्य सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.या यशाबद्दल त्यांच्या कुटुंबीय, सहकारी शिक्षक व विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# मानवतावादी विचारवंत डॉ. म. सु. पगारे यांचे ग्रंथदान

**बहाळ :** मोबाईल या घटकामुळे विद्यार्थी वर्ग वाचनापासून लांब चाललाय. वाचन संस्कृतीने अनेक विदवत व प्रज्ञावन्त समाजाला दिले असून त्यामुळे समाज सुजाण व सजग झाल्याचे सर्वश्रुत आहे.मोबाईलच्या विळख्यात अडकलेल्या वर्तमान पिढीतल्या तरुणांमध्ये वाचनाभिरुची रुजू करावी या दुरदृष्टीतून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक तथा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रोफेसर डॉ.म.सु. पगारे यांनी बहाळ ता.चाळीसगाव येथील साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयास ८६००० रुपये किमतीची ३८१ वैविध्यपूर्ण पुस्तके ग्रंथदानाच्या माध्यमातून काल दि.३१.३.२०२६ रोजी वाचनालयाचे अध्यक्ष श्री. शिवराम चौधरी यांना सुपूर्त केलीत. यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष श्री.भीमराव बोरसे, सचिव पी.एस.करंकाळ, दुय्यम सचिव श्री.संतोष भोई यांचेसह संचालक मंडळाची उपस्थिती होती. डॉ. पगारे यांचे माध्यमिक शिक्षण बहाळ येथे झाले असल्याने गावाचे मी देणे लागतो.या कृतज्ञ भावनेने वर्तमान पिढीसाठी व येणाऱ्या पिढ्यांसाठी केलेले हे विपुल ग्रंथदान गावकऱ्यांना भारावणारे होते. स्वतः डॉ.म.सु.पगारे हे सिद्धहस्त लेखक,समीक्षक,संशोधक,कवी तथा द्रष्टे वक्ता म्हणून महाराष्ट्रास परिचित आहेत.त्यांनी आजवर साठ ग्रंथांचे लेखन केले असून अनेक विद्यापीठात त्यांच्या ग्रंथांवर पीएच.डी सुद्धा झालीय.इटली,व्हेनिस,मलेशिया,दुबई,पुणे येथे संपन्न झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.त्यांच्या बा, तथागता या विशाल मराठी कवितेची हिंदी,इंग्रजी व अहिराणी भाषेत अनुवाद झाले असून त्यावरचे समीक्षा ग्रंथही प्रकाशित झाले आहेत. एका ज्ञान तपस्व्याने ऋणाईत होऊन आपल्या गावाला दिलेले हे ग्रंथदान अखिल मानवतेला गवसणी घालणारे असून बहाळ येथील ग्रामस्थ आणि साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयाच्या संचालक मंडळाने याबद्दल आनंद आणि समाधान व्यक्त केलेय. यावेळी एरंडोल येथील साहित्यिक विलास मोरे, संशोधक विद्यार्थी कैलास पाटील, संशोधक विद्यार्थी अस्मादिक पगारे यांचीही उपस्थिती लाभली.

## इकरा पब्लिक शाळेच्या शिक्षकांची शैक्षणिक भरारी; डॉ. करीम सालार यांच्याकडून 'शाब्बासकी'ची थाप!



**जळगाव :** शिक्षण क्षेत्रात आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवणाऱ्या इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला असून,शाळेतील शिक्षक इश्तियाक अहमद आणि साजिद खान यांनी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत (CTET) घवघवीत यश संपादन केले आहे. अत्यंत कठीण मानली जाणारी ही राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा या दोन्ही शिक्षकांनी कोणत्याही विशेष प्रशिक्षणाशिवाय आपल्या पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण करून आपली शैक्षणिक पात्रता सिद्ध केली आहे.या गौरवपूर्ण कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ.करीम सालार आणि शाळेचे प्राचार्य शेख शकील यांच्या हस्ते दोन्ही शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.या प्रसंगी बोलताना डॉ.करीम सालार यांनी शिक्षकांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप देत नमूद केले की, शिक्षकांचे हे यश म्हणजे शाळेच्या उच्च शैक्षणिक दर्जाचे आणि त्यांच्या कठोर परिश्रमाचे फळ असून, याचा थेट लाभ शाळेतील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी होणार आहे.

या सोहळ्याप्रसंगी डॉ. शोएब शेख शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी दोन्ही यशस्वी शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०२ मार्च २०२६


## त्या तप्त तव्याची भाकर, पापुडा घेऊन उठते ती खरी कविता असते : डॉ प्रभाकर शेळके




**जालना :** 'एक ओळ लिहिती राहिली पाहिजे,माझ्या नंतर ही ..'या शब्दवेड्या कवी सुनील उबाळे या कामगार कवीने पंधरा वर्षांपूर्वी शताब्दी कांबळे या कवयित्रीच्या नावाने स्थापन केलेल्या 'शताब्दी काव्य मंडळ' संभाजीनगर आयोजित निमंत्रिताचे काव्य काव्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून कवीवर्य डॉ प्रभाकर शेळके जालना यांनी काव्यमय अध्यक्षीय भाषण केले.नवोदित व आजच्या समकालीन कवींमध्ये कवितेचा आरसा उलगडून दाखवताना " जे अस्सल जगणं असते,जे खुपते भंयकर सलते,ती ठसठस होऊन जाते,ती खपली मखमली होते,ती खरी कविता असते.या कवी काव्याच्या पसाऱ्यात कुण्या भामट्या कवीने,केली चाभरी कविता, तिच्या वाफेन जळली,झाली अफवा कविता, कवितेचीसाधना असते ती साध्यतेने साधूक होऊन पोचवावी लागते.कसे रिंगण भारते,डंख नागीन कविता,खोल चढतं जहर,घेते लहऱ्या कविता.ही कवीची सृजनशील साधना असते.असे भाष्य केले.महामानवाला विनम्र अभिवादन करणारी कविता अध्यक्षीय समारोपात सादर केली.प्रमुखअतिथी म्हणून विधीज्ञ अँड योगेश अक्कर हे होते.याप्रसंगी माधुरी चौधरी,शमा बरडे, मृणाल देशपांडे, सुरेखा काळदाते, सुनीता कपाळे, भावना मोगल, श्रावणी साबळे, रमेश ठोंबरे डॉ राज रणधीर, गिरीश जोशी, चक्रधर डाके, मधुकर दिवेकर, संदिप भदाने, आदित्य इंगळे या कवी कवयित्रीने आपल्या आशय संपन्न कविता सादर केल्या.

या प्रसंगी बासरी वादन व वटवृक्षला पाणी देऊन कार्यक्रमाची सुरुवात केली.जेष्ट सामाजिक कार्यकर्ते राम बाहेती, डॉ सुधाकर शेंडगे, डॉ समाधान इंगळे, कृष्ण कदम, हबीब भंडारे इ मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन विजयकुमार पांचाळ यांनी केले.

## बा भीमाचं देणं

देशाचे आर्थिक नियोजन
माझ्या बा भीमाचं देणं
रुपयाचा प्रश्न ग्रंथ आहे
रिझर्व बँक रुपी लेणं. १

बा भीमाच्या ज्ञानाने
बसवली देशाची घडी
ठेवलीच नाही कुठे
जगतांना मनात अडी. २

बाबा तुमचे उपकार
देशावर आहेत खूप
राब राब राबून तुम्ही
बदलले देशाचे रूप. ३

देशाला संविधान देऊन
सर्वांना स्वातंत्र्य दिले
अंधारातल्या माणसांना
प्रकाशमान तुम्ही केले. ४

बा भीमरायांचे उपकार
कधी फिटणार नाही
जीवन जगतांना सदा
भिमरायास पुढे पाही. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## उन्हाचा पारा

उन्हाळ्यात येतो
सूर्याला राग
नाराज होऊन
ओकतो आग

उन्हाचे साम्राज्य
जिकडे तिकडे
घालूया आता
सुती पांढरे कपडे

अंगाची होई
लाही लाही
झाडाच्या सावलीत
जो तो विसावा घेई

वाढणार किती
उन्हाचा पारा?
पानझड करतो
खट्याळ वारा

टरबूज खरबूज
आपण खाऊ
उष्माघाताला
दूर ठेऊ



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## "आई गं जाऊ नको तू देवा घर, तुझ्या आठवणीने भरून येई ऊर"



**छत्रपती संभाजीनगर :** येथे दुसरे शिक्षक साहित्य संमेलन घेण्यात आले होते. त्यामध्ये स्वागतअध्यक्ष म्हणून संभाजीनगर जिल्हा परीषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती आश्विनीताई लाठकर- पानसरे यांनी कार्यक्रमाची सर्व सुत्र हाती घेऊन दूसरे शिक्षक संमेलन यशस्वी केले. यामध्ये निमंत्रितांचे कवि संमेलनाचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगांवकर हे होते. कवि संमेलनात २५ शिक्षक-शिक्षका कवीने सहभाग घेतला होता. कवि संमेलनाची सांगता अय्युब पठाण यांच्या " आई " या कवितेने झाली. अय्युब पठाण यांनी " आई " या कवितेचे सादरीकरन इतके प्रभावीपणे केले की सुरुवातीलाच शेरोशाहीरीने सर्व सहभागी शिक्षक-शिक्षिकांना भरपूर हसविले आणि कविता सादरीकरन रंगात येत असतानाच पठाण यांनी आपल्या मधूर आवाजात करुणरसामध्ये व शिवरंजनी रागामध्ये आणि पंजाबी गीत असलेल्या " गोरी रे मै जाना परदेश " या गहीवरल्या चालीत कविता गायली. ही कविता ऐकून सभागृहातील सर्वाचे डोळे पाणावले. कवितेचे प्रभावी सादरीकरन आणि अय्युब पठाण यांची सेवानिवृतीमुळे माध्यमिक शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर हे " आई " कविता ऐकून खूप भावनिक झाल्या आणि त्यांनी अय्युब पठाण लोहगावकर यांना दुसऱ्या दिवशी जिल्हा परिषद कार्यालयात बोलावून आनंदाने पेढा भरविला. आणि पुढच्या साहित्य लेखनास शुभेच्छा दिल्या.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी राहुल शिंदे यांची निवड



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सव समिती कार्यकारणी जाहीर करण्यात आलेली आहे. सामाजिक व प्रभावीपणे काम करण्याच्या उद्देशाने ही कार्यकारणी गठीत करण्यात आली आहे. नवीन कार्यकारणीत खालीलप्रमाणे पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे :- अध्यक्ष : राहुल (अण्णा) शिंदे - उपाध्यक्ष : रतन निवृत्ती जाधव - स्वागत अध्यक्ष: सिद्धार्थ सोनवणे कार्याध्यक्ष: मलंग (बाबा) शेखया प्रसंगी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी. वडमारे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रसंगी मुबारक पठाण, मच्छिंद्र वाय पाटील, बंडू तांदळे ,मनोज पगारे ,विलास खरात, मनोज सुरडकर ,उमेश गव्हाणे, पंकज कोटकर, सोमीनाथ मोरे तसेच पक्षातील अनेक नेते उपस्थित होते.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०२ मार्च २०२६


## तोफखाना केंद्रीय विद्यालयात रिक्त जागांसाठी प्रवेश सुरू

**नाशिक रोड (प्रतिनिधी) :** तोफखाना केंद्र परिसरातील पीएमश्री केंद्रीय विद्यालय, नाशिक रोड कॅम्प येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी इयत्ता १२वीच्या तसेच 5 वी च्या नवीन प्रवेशाकरिता ऑफलाइन अर्ज मागविण्यात आले आहे. हे प्रवेश पात्रता निकषांच्या अधीन असतील, अशी माहिती प्राचार्य गजराज मीना यांनी दिली.उमेदवारांनी सीबीएसई मान्यताप्राप्त शाळेत तेच विषय किंवा अभ्यासक्रम शिकलेले असावे. इयत्ता ११वीच्या परीक्षेत किमान ५५% गुण अनिवार्य आहेत. विद्यार्थ्यांनी केव्हीएसच्या सर्व सामान्य प्रवेश मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करणे आवश्यक आहे. या सोबतच, विद्यार्थ्याने निवडलेला विषयांचा समूह शाळेत उपलब्ध असणे आवश्यक आहे.प्रवेशासंबंधीचा अंतिम निर्णय प्राचार्यांकडून रिक्त जागा आणि गुणवत्तेनुसार घेतला जाईल. संरक्षण क्षेत्रातील उमेदवार आणि सेवा श्रेणी १ व २ यांना प्रवेशात प्राधान्य दिले जाईल.

इयत्ता १२वी कला शाखेत २२,वाणिज्य शाखेत ९, विज्ञान शाखेत ७ जागा आणि इयत्ता 5 वी मध्ये 2 प्रवेश रिक्त आहेत. २ एप्रिल ते ८ एप्रिल दरम्यान, दुपारी १२ ते २ या वेळेत, शाळेत प्रवेश समितीशी प्रत्यक्ष संपर्क साधण्याचे आवाहन प्राचार्य गजराज मीना यांनी केले आहे

## अमन आंबेडकर, प्रा. सूर्यवंशी व मोरे यांचा सत्कार



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांचे चिरंजीव तथा महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू ॲड. अमन आंबेडकर व प्रदेशाध्यक्ष प्रा.सूर्यवंशी , आणि शुद्ध धन मोरे हे नांदेड दौऱ्यावर असताना रिपब्लिकन सेना युवा जिल्हाध्यक्ष प्रितम वाकळे, वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते शरद चव्हाण, वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हा महासचिव सतीश भैय्या वाकळे, जेष्ठ नेते धम्मदीपजी साळवे वसेकर, गजाननबहिरट मामा मुडा, मुस्लिम समाजातील ज्येष्ठ नेते, मुसा भाई, फिरोज भाई, कैकाडी समाजातील युवा नेतृत्व गजानन पवार, दौलत गायकवाड लिंगायत समाजातील नेते अविनाश गयाळ आप्पाभारतीय बौद्ध महासभा कार्यकारणी, जिंतूर येथील महेंद्र बनसोडे, मोहन घनसावंत, सुमेध सूर्यवंशी, शंकर वाघ,बळीराम उबाळे सर, गौतम मस्के, लखन कुरे,नामदेव जी प्रधान साहेब, अक्षय सूर्यवंशी, अक्षय भोकरे, राजू खंदारे वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन सेना, समता सैनिक दल, भारतीय बौद्ध महासभा यांच्या सर्व ग्रामीण तथा स्थानिक कार्यकर्त्यांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

## आरोग्य भक्ती शक्ती चा त्रिवेणी संगम कळंकी येथील वीरहनुमान देवस्थान



कळंकी ता. कन्नड येथील ऐतिहासिक वीरहनुमान देवस्थान ग्राम दैवत च नाही. तर आरोग्य, भक्ती, शक्ती चे त्रिवेणी संगम असलेले मराठवाड्यातील भाविकांचे श्रध्दास्थान आहे. त्यामुळे दरवर्षी हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात.सह्याद्री पर्वताची उपरांग असलेल्या सातमाळ, अजिंठा डोंगर रांगेच्या कुशीत वसलेले एक निसर्गरम्य गाव म्हणजे कळंकी, संभाजीनगर, जळगाव, नाशिक या तीन जिल्ह्यांचा हा सीमावर्ती भाग, हा गाव परिसर म्हणजे वाकाटक साम्राज्य व पुढे यादव मांडलिक साम्राज्यातील विज्जलगड राज्याचा एक भाग, उत्तरेस प्राचीन पितळखोरे लेणी, पाटणादेवी, जैनलेणे, हेमाडपंथी शिवालय, कन्हेरगड किल्ला, केदारकुंड, पुराश्मयुगीन मद्रासीबाबा अरण्य, पश्चिमेस संत जनार्दन स्वामी प्रथम जोतीर्लींग पिनाकेश्वर, दक्षिणेस पेडकादुर्ग, पंधरा किमी. अंतरावर सुवर्णपालेश्वर, थापलालेणी असा गौरवशाली शेजार गाव परिसरास लाभला आहे. उत्तरेस गौताळा अभयारण्याची रांग, पुर्व, पश्चिम, दक्षिण विस्तीर्ण जंगल, पुरातन पाण्या च्या टाक्यांची साखळी, विशेष म्हणजे संभाजीनगर जिल्ह्यातील सर्वात मोठी नदी असलेल्या शिवनानदी चे उगमस्थान,गावाचे खरे वैभव म्हणजे एकेकाळी उंच उंच बुरुजांची गढी, याच गावात प्रसिद्ध असे जागृत दक्षिणमुखी वीर हनुमान मंदिर प्रसिद्ध आहे. ही शिवनातीरा वरील हनुमंताची पुरातण भव्य मुर्ती कोणी स्थापीत केली याचे ऐतिहासिक पुरावे नसले तरी तीची स्थापना रामदास स्वामी नी केली अशी भाविकांची धारणा आहे. परंतु याला ऐतिहासिक पुरावे उपलब्ध नाहीत. वीरहनुमान मंदिर हे इ.स 2000 पर्यंत एक छोटेखानी मंदिर होते. त्याचे धार्मिक महत्व ओळखून ग्रामस्थांनी लोकवर्गणी च्या माध्यमातून दिडशे फुट ऊंचीचे एक भव्यदिव्य असे मंदिर उभारले, मंदिर कळस अनेक देवीदेवतां च्या शिल्पांनी मढविले आहे, रामायण, महाभार, पौराणिक देवी देवतांच्या शेकडो मुर्त्या कळसात मढविल्या आहेत. तसेच सिंह, वानर आदी प्राण्यांच्या मुर्त्या प्राणीमात्रांशी असलेले नाते सांगतात, दरवाजा च्या बाजुला उभे असलेले द्वारपाल जिवंत भासतात. हनुमान मंदिर परिसरात भवानीमाता, महादेव, खंडोबा, लक्ष्मीदेवी आदिंची मंदिरे ही आहेत. मंदिराच्या पाठी मागून शिवनानदी वाहते. या नदीत पुरातन बारव होती, आता ती बुजली आहेत. पावसाळ्यात हा सबंध परिसर हिरव्या गर्द वनराई व नदी ओढ्यांच्या खळखळण्याने बहरुण जातो. येथील वीरहनुमान जागृत माणल्या जातो. येथे मांडी, गुडघी, गालफुगी चे आजार बरे होतात. अशी भाविकांची श्रध्दा आहे. त्यामुळे मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्रातून हजारो भाविक येथे भेट देतात. हनुमान जयंती निमित्त दरवर्षी येथे पंचमी उत्सव आयोजित केल्या जातो. याची सुरुवात रामनवमीच्या पर्वा पासून होते. यात पौराणिक कथा, पात्रांचे सजिव देखावे व महती सांगणारी सोंगे काढली जातात. हनुमान जयंती च्या दिवशी मानाचे चंडिका भवानी मातेचे सोंग काढून केल्या जाते. त्यामुळे या देवस्थानाच विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

**अरुण थोरात, कळंकीकर**





